# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

'विद्याविहार', पो. लोणेरे- ४०२ १०३, ता. माणगाव
जिल्हा- रायगड. (महाराष्ट्र राज्य) भारत.

registrar@dbatu.ac.in    दुरध्वनी क्रमांक : 02140-275142/275212


---

क्रमांक : डॉ.बाआंतंवि/शै. वि./नॅशनल स्कॉलरशिप/२०२०-२१/
दिनांक : १९/१०/२०२०

**शैक्षणिक विभाग**

## नोटीस

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशित पदवी व पदव्यत्तर पदवी सर्व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सुचना देण्यात येते की, केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फत गुणवत्ता – नि - साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स) योजना राबवीली जाते. सदर शिष्यवृत्ती व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, पारशी आणि जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरीता व ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये २.५० लाखांपर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अल्प संख्यांक कार्य मंत्रालयाच्या www.minorityaffairs.gov.in या वेब साईटवर देण्यात आलेली आहे. सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडुन विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यामध्ये डीबीटी अंतर्गत जमा करण्यात येते. अल्पसंख्यांक समाजातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना नवीन शिष्यवृत्ती (fresh) व शिष्यवृत्ती नुतनीकरणासाठीचे (Renewal) ऑनलाईन अर्ज www.scholerships.gov.in या संकेतस्थळावर केंद्र शासनाने जाहिर केलेल्या तारखेनुसार संकेतस्थळावर देण्यात आलेल्या user manual/ Guideline व FAQ चा वापर करुन दि. ३१/१०/२०२० पूर्वी भरायचे आहेत.

टिप :- विद्यार्थ्यांने एकाच शैक्षणिक वर्षात दोन – दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करण्याकरीता अर्ज सादर करु नयेत. एकाच शिष्यवृत्ती करीता अर्ज सादर करण्यात यावेत.

विभाग नियंत्रक,
शैक्षणिक विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे - रायगड.

प्रत माहितीसाठी :

१. सर्व विद्यार्थी
२. नोटीस बोर्ड (सुचना फलक),
३. युनिव्हर्सिटी वेबसाईट